ePaper

|| वर्ष - 7 | अंक - 359 || UDYAM-MH-26-0158827 ||

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | रविवार, दिनांक 30 जून 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# चॅम्पियन टीम इंडिया! 17 वर्षांनी जिंकला टी-20 विश्वचषक




टी20 विश्वचषक 2024 चा अंतिम सामना भारत आणि दक्षिण आफ्रिका संघांमध्ये ब्रिजटाऊन, बार्बाडोस येथील केन्सिंग्टन ओव्हल येथे खेळला गेला. हा सामना जिंकून टीम इंडियाने 11 वर्षांपासून सुरू असलेला ICC ट्रॉफीचा दुष्काळ संपवला. त्याचवेळी भारतीय संघाने 17 वर्षांनंतर टी-20 विश्वचषक जिंकला. टीम इंडियाने यापूर्वी 2013 मध्ये आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफीचे विजेतेपद पटकावले होते. (सविस्तर वृत्त पान ८ वर)

## ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीचे पंढरपूरकडे प्रस्थान

# विठू नामाच्या गजरात दुमदुमली आळंदी!

। पिंपरी ।महाईन्यूज

**टाळ-मृदुंगाच्या तालावर भक्तिरसात चिंब झालेले वारकरी.... 'ज्ञानोबा माऊली', 'माऊली, माऊली' चा गजर.... डोक्यावर तुळशी वृंदावन, हाती दिंड्या-पताका घेतलेले वारकरी...आळंदी येथून आषाढी वारीसाठी श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याने मुख्यमंत्री शिंदे यांच्या उपस्थितीत पंढरपूरकडे प्रस्थान ठेवले.**



आळंदी येथील संत ज्ञानेश्वर महाराज समाधी मंदिरात मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी माऊलींच्या पादुकांचे दर्शन घेतले. यावेळी केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, खासदार श्रीरंग बारणे, प्रधान सचिव प्रवीण दराडे, विभागीय आयुक्त डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील, प्रमुख जिल्हा न्यायाधीश महेंद्र महाजन, नगर परिषदेचे मुख्याधिकारी कैलास केंद्रे, श्री संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे प्रमुख विश्वस्त ॲड. राजेंद्र उमाप, विश्वस्त व पालखी सोहळा प्रमुख योगी निरंजननाथ, विश्वस्त डॉ.भावार्थ देखणे, गुरु हैबतबाबा यांचे वंशज बाळासाहेब पवार – आरफळकर, ह.भ.प राणा महाराज वासकर, ह.भ.प संग्राम बापू भंडारे महाराज आदी उपस्थित होते.

### वारकऱ्यांसाठी शासनातर्फे सुविधा..

आषाढी वारीसाठी येणाऱ्या वारकऱ्यांना सोई-सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी जिल्हा प्रशासन, मंदीर संस्थान, पुणे व पिंपरी-चिंचवड मनपाने तयारी केली आहे. आळंदीत पाण्याची सोय, विजेची सोय, वैद्यकीय पथके, पालखी मार्गाचे वेळापत्रक, मंदिराच्या प्रवेशद्वारावर धातूशोधक यंत्रणा, सुलभ शौचालय, पोलीस मदत केंद्र, अग्निशमन यंत्रणा, रुग्णवाहिका, नदी पात्रात बोटीची व्यवस्था, सूचना फलक अशी व्यवस्था करण्यात आली असून जागोजागी सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्यात आलेल्या आहेत.

# पुण्यात मेफेड्रोन तस्करांचे जाळे!

## नशेच्या अमलाखाली शहरातील रात्रजीवन

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुण्यातील पबमध्ये अमली पदार्थांचे सेवन करणाऱ्या तरुणांची चित्रफीत व्हायरल झाल्यानंतर खळबळ उडाली असली, तरी हा प्रश्न फक्त पुण्यापुरताच नाही. अमली पदार्थ ज्या सहजपणे उपलब्ध होत आहेत आणि तरुण पिढी ज्या वेगाने त्यांच्या आहारी जात आहे, ते सगळे खरोखरच चिंताजनक आहे. काही हॉटेल्स आणि पब्जवर धाडी घालून हा प्रश्न सुटणार आहे का? त्याच्या मुळाशी जायची आपली इच्छा आणि तयारी आहे का?**

पुण्यात अफू, गांजा, चरस या अमली पदार्थांचे सेवन श्रमिक आणि उच्चभ्रू वर्गात केले जात होते, त्याला आता जवळपास ३० वर्षे उलटून गेली. १९९० च्या दशकात ब्राऊन शुगर अर्थात गर्दच्या विळख्यात तरुणाई अडकली. आता त्याची जागा मेफेड्रोनने घेतली आहे. आकर्षण, मित्रमंडळींचा आग्रह, पालकांनाच सेवन करताना पाहणे, प्रतिष्ठेचे लक्षण, हिरोगिरी आणि 'हे आता सर्वमान्य आहे,' हा समज अशा कारणांनी अमली पदार्थ सेवन करण्याकडे तरुणाई वळत आहे. साखरेप्रमाणे दिसणारे, गंधहीन, चवहीन मेफेड्रोनची चटक तरुणाईला लागली आहे. पुणे, मुंबईत वास्तव्य करणारे काही नाजयेरियन नागरिक या तस्करीत गुंतले आहेत. मेफेड्रोनसह 'एलएसडी स्टँप'ची नशा करण्याचे प्रमाणही तरुणाईत वाढले आहे. पुणे ग्रामीण पोलिसांनी सिंहगड पायथ्याजवळ डोणजे गावात सुमारे २० वर्षांपूर्वी एका रेव्ह पार्टीवर छापा टाकला होता. या पार्टीत पुणे-मुंबईतील तरुण-तरुणी सामील



झाले होते. रेव्ह पार्टी म्हणजे काय हा प्रकार तेव्हा सर्वसामान्यांना माहीत नव्हता. या पार्टीत सापडलेले अमली पदार्थ आणि त्यांचे सेवन करणारे विशी-पंचविशीतील तरुण हा त्या वेळी पुण्यात मोठ्या चर्चेचा विषय झाला होता. पुण्यासारख्या सांस्कृतिक शहरात असे काही होणे त्या वेळी नवीन होते. त्याच्या कारणांचा पाठपुरावा करताना बदललेल्या पुण्याचे चित्र समोर आले.पुणे शहर आणि परिसरात साधारण अडीच दशकांपूर्वी आयटी पार्कच्या निमित्ताने माहिती तंत्रज्ञान कंपन्या सुरू झाल्या. देशभरातील तरुण-तरुणी नोकरीनिमित्ताने बाणेर, बालेवाडी, कल्याणीनगर, विमाननगर, पिंपळे सौदागर, बावधन आदी भागांत वास्तव्य करून राहिले. त्यांना मिळणाऱ्या गलेलठ्ठ पगारात मूलभूत गरजांबरोबरच मनोरंजनासाठी निरनिराळ्या मार्गांचा अवलंब करणे सहज शक्य होऊ लागले. 'नवीन' अनुभव घेण्यास उत्सुक अशा 'ग्राहकां'साठी पब, रेस्टॉरंट, मद्यालयांचे पेव फुटले. रात्री उशिरापर्यंत पार्ट्या रंगू लागल्या. मोठ्या आवाजातील संगीत, त्यावर बेधुंद होऊन नृत्य आणि त्यातून मिळणारा आनंद तरुणाईला हवाहवासा वाटू लागला. पुण्याच्या परिघावर डान्स बार सुरू झाल्याचा काळही साधारण हाच. या मनोरंजनाची 'नशा' आणखी वाढविण्याच्या दृष्टीने अशा पार्ट्या, स्नेहसंमेलनांत अमली पदार्थांचा शिरकाव सुरू झाला. कॅम्प, कोरेगाव पार्क, मुंढवा, कल्याणीनगर या विशेषतः पुण्याच्या परिघावर असलेल्या भागांमधील रात्र आणि रात्रोत्तर जीवन तरुणाईत लोकप्रिय होऊ लागले. यातील अनेक पब आणि बारमध्ये होणाऱ्या पाश्चात्त्य संगीताच्या कार्यक्रमांच्या जोडीला मद्याबरोबरच अमली पदार्थांची जोडही सहज मिळू लागली. अमली पदार्थांचे सेवन, मद्यापार्ट्यांचे पेव पुण्यात फुटले. या पार्ट्यांमुळे रहिवाशांना होणारा त्रास, पार्ट्यांनंतर होणारी भांडणे, छेडछाडीचे प्रकार हेही सर्व होतच होते. कल्याणीनगर अपघात प्रकरणानंतर या सगळ्याचा कडेलोट होऊन सामान्य पुणेकराच्या सहनशीलतेचा अंत झाला. त्यानंतर लगेचच एल थ्री बारमधील पार्टीमुळे पुण्यातील रात्र जीवनाचे भीषण वास्तवही समाजासमोर आले.

### अमली पदार्थ येतात कुठून?

मुंबई, पुणे, बेंगळूरु, चंडीगड, दिल्लीसह देशभरातील प्रमुख शहरांत अमली पदार्थ तस्करांनी त्यांचे जाळे उभे केले आहे. गेल्या वर्षी पुण्यात अमली पदार्थ तस्कर ललित पाटीलच्या साथीदारांकडून कोट्यवधी रुपयांचे अमली पदार्थ जप्त करण्यात आल्यानंतर तरुणांमधील नशेखोरी चर्चेत आली होती. अमली पदार्थ सेवन करणाऱ्या तरुणांकडून मेफेड्रोनला सर्वाधिक मागणी आहे. त्या खालोखाल गांजा, चरस, कोकेन, ब्राउन शुगर, अफू अशा अमली पदार्थांची विक्री शहरातील उच्चभ्रू भागांत होते. यातील काही पदार्थ तर पानटपरीवरदेखील मिळतात. या धंद्यात काही इराणी तस्करही सामील असल्याचे बोलले जाते. अमली पदार्थांचे काही व्यवहार तर समाजमाध्यमांवरही होतात.

# इंद्रायणी प्रदूषणमुक्त करणारच : मुख्यमंत्री

## इंद्रायणी नदीसुधार योजनेचे काम लवकरच सुरू होईल

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**इंद्रायणी नदी प्रदूषणमुक्त करण्याचे वचन मी दिले आहे. नदी प्रदूषणमुक्तीसाठी नगरविकास विभागाने ८०० कोटी रुपयांचा निधीही उपलब्ध करून दिला आहे. त्यामुळे नदीसुधार योजनेचे काम लवकरच सुरू होईल, अशी माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आळंदीत दिली.**



संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी प्रस्थान सोहळ्याला मुख्यमंत्री शिंदे यांनी हजेरी लावली. गेल्या काही दिवसांपासून इंद्रायणीच्या प्रदूषणाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. वारीच्या तोंडावर नदीतील पाण्यावर मोठ्या प्रमाणात तवंग आला होता. त्यामुळे वारकरी, देवस्थानने नाराजी व्यक्त केली होती. याबाबत बोलताना मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, इंद्रायणी नदी प्रदूषणमुक्त करणे हे सरकारचे काम आहे. त्यासाठी पावले उचलली आहेत. नगरविकास विभागाने निधी उपलब्ध करून दिला आहे. इंद्रायणी प्रदूषणमुक्तीसाठी काम सुरू आहे. लवकरच प्रत्यक्षात कामाला सुरुवात होईल.मला या पालखी सोहळ्याला येण्याची संधी मिळाल्याने मी स्वतःला भाग्यवान समजतो. राज्यातील बळीराजा सुखी होऊ दे, त्याच्यावरील सर्व संकटे, अनिष्ट दूर होऊ देत, महाराष्ट्रातील जनतेला सुखी, समाधानी, आनंदाचे दिवस येऊ दे अशी माउलीचरणी प्रार्थना केल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.मुख्यमंत्री आळंदीत प्रस्थान सोहळ्यासाठी येण्याची ही पहिलीच वेळ आहे. यापूर्वी कोणतेही मुख्यमंत्री पदावर असताना आळंदीत प्रस्थान सोहळ्यासाठी आले नव्हते. आघाडी सरकार असताना राज्याचे उपमुख्यमंत्री दिवंगत आर. आर. पाटील आणि अजित पवार उपमुख्यमंत्री असताना प्रस्थान सोहळ्याच्या दिवशी मंदिरात दर्शनासाठी आले होते. मात्र, मुख्यमंत्री आळंदीत प्रस्थान सोहळ्यासाठी येण्याची ही पहिलीच वेळ असल्याचे सांगण्यात आले.

### प्रदूषणाचा प्रश्न ऐरणीवर आला

संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी प्रस्थान सोहळ्याला मुख्यमंत्री शिंदे यांनी हजेरी लावली. गेल्या काही दिवसांपासून इंद्रायणीच्या प्रदूषणाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. वारीच्या तोंडावर नदीतील पाण्यावर मोठ्या प्रमाणात तवंग आला होता. त्यामुळे वारकरी, देवस्थानने नाराजी व्यक्त केली होती. याबाबत बोलताना मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, इंद्रायणी नदी प्रदूषणमुक्त करणे हे सरकारचे काम आहे. त्यासाठी पावले उचलली आहेत. राज्यातील बळीराजा सुखी होऊ दे, त्याच्यावरील सर्व संकटे, अनिष्ट दूर होऊ देत, महाराष्ट्रातील जनतेला सुखी, समाधानी, आनंदाचे दिवस येऊ दे अशी माउलीचरणी प्रार्थना केल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

# ताम्हिणीत पर्यटकाचा मृत्यू!

## पाण्याचा अंदाज न आल्याने अपघात, महिन्यातील दुसरी घटना

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**ताम्हिणी येथील मिल्की बार धबधबा येथे पाण्याचा अंदाज न आल्याने पर्यटकाचा मृत्यू झाला. ही घटना गुरुवारी दुपारी घडली. याच ठिकाणी पर्यटकाचा मृत्यू झाल्याची ही महिनाभरातील दुसरी घटना आहे.**



ताम्हिणी परिसरातील प्लस व्हॅलीमधील मिल्की बार धबधबा येथे पोहताना पाण्याचा अंदाज न आल्याने आदेश जितेंद्र पवार (वय २१, रा. वडगाव धायरी, मूळ रा. जळगाव) असे मृत तरुणाचे नाव आहे. धबधब्यामध्ये तरुणाचा मृत्यू झाल्याची माहिती मिळताच मृतदेह बाहेर काढण्यासाठी लोणावळ्यातील शिवदुर्ग संघ, माणगाव आपत्ती व्यवस्थापन, रोहा आपत्कालीन पथक, मुळशी आपत्ती व्यवस्थापनाचे तरुण, वनविभाग, पोलिस आणि 'गिरीप्रेमी'चे वरुण भागवत, मिहीर जाधव यांनी घटनास्थळी रेस्क्यू ऑपरेशन केले. आदेश नाशिकच्या मित्रांबरोबर पर्यटनासाठी गेला होता. धबधब्याला भरपूर पाणी असल्याने पोहताना अंदाज न आल्याने पाण्यात बुडून त्याचा मृत्यू झाला. खोल दरीमध्ये मृतदेह असल्याने बचावकार्यही अनेक तास सुरू होते. रात्री अकरा वाजता मृतदेह पोलिसांच्या ताब्यात देण्यात आला, अशी माहिती बचाव पथकांकडून देण्यात आली.

### धाडस न करण्याचे आवाहन

'समाजमाध्यमांवरील 'रील्स' पाहून ही मित्रमंडळी पर्यटनासाठी आली होती. नागरिकांनी समाजमाध्यमांवरील आशय पाहून पर्यटन करण्याचे धाडस करू नये. ताम्हिणी घाट आणि परिसरातील रस्ते निसरडे झाले असून, स्थानिक किंवा परिसराची माहिती असणारी व्यक्ती सोबत असावी,' असे आवाहन बचाव पथकांनी केले आहे.पावसाळी पर्यटन नियमातच! वनविभागाने आखली लक्ष्मरेषा; नियम मोडल्यास थेट होणार कारवाई

### महिन्यातील दुसरी घटना

पावसामुळे सध्या नागरिक मोठ्या प्रमाणावर पर्यटनासाठी बाहेर पडत आहे. पुण्याजवळील किल्ले, धबधबे, घाटरस्ते येथे पर्यटकांची गर्दी वाढण्यास सुरुवात झाली आहे. मात्र, पर्यटकांच्या अतिधाडसामुळे दुर्घटना घडत आहेत. जूनच्या पहिल्या आठवड्यात काही पर्यटक या धबधब्यात वर्षा सहलीसाठी गेले असताना पाण्याचा अंदाज न आल्याने एका तरुणाचा दरीत पडून मृत्यू झाला होता.

# पिंपरी डेअरी फार्म येथील उड्डाण पुलाचे काम प्रगतीपथावर!

## 30 टक्के काम पूर्ण, एकूण 10 पिअर उभारण्यात येणार

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी डेअरी फार्म येथे मुंबई पुणे रेल्वे मार्गावर फाटक अस्तित्वात आहे. यामुळे पिंपरी गावातून निगडी दापोडी रस्त्यावर नागरिकांना विनाअडथळा वाहतुक शक्य होत नाही. तसेच मुंबई पुणे रेल्वे महामार्ग हा प्रस्तावित फ्राईट कॉरिडोर असल्याने रेल्वे खात्याला या मार्गावरील येणारे सर्व क्रॉसिंग बंद करणे अपेक्षित आहे.**




यासाठी रेल्वे आणि स्थानिक संस्था निम्मा खर्च करणेस तयार असल्याने नागरिक व स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या मागणीचा विचार करून मुंबई पुणे रेल्वे मार्गावर पिंपरी डेअरी फार्म येथे रेल्वे मार्गावर पुल बांधणेचे काम प्रगतपथावर आहे.या कामांतर्गत एकूण १० पिअर उभारण्यात येणार असून त्यापैकी ७ पिअरचे काम पिअर कॅपसह पुर्ण झालेले आहे. ८ व्या पिअरचे फुटींगचे काम झालेले असून पिअर कॉलमचे काम सुरू आहे. पिअर ९ व पिअर १० मधील स्लॅबच्या कामासाठी आवश्यक स्कॅफोल्डींग उभारण्यात आलेली असून लोखंडी सळई बांधणेचे काम चालू आहे. तसेच उर्वरित दोन पिअर व त्यामधील ४५ मी. लांबीचा रेल्वे लाईन वरील उड्डाण पुलाचे अंतिम रेखांकन रेल्वे विभागाकडे मंजूरीसाठी पुन:श्च पाठवण्यात आलेले असून मंजूरी मिळ्याल्यानंतर सदर कामाचे नियोजन करण्यात येणार आहे. आज रोजी सुमारे ३० % काम झालेले असून पुढील काम प्रगतीपथावर आहे.त्यामध्ये ५६५ मी. लांब व १७.२० मी. रूंद असा चार पदरी उड्डाण पुल आणि मुंबई पुणे रस्त्यापासून पॉवर हाऊस चौक पिंपरी पर्यंत १३०० मी. लांबीचा व १८ मी. रूंदीचा रस्ता करण्यात येणार आहे. सदर प्रकल्पामुळे पुणे शहरातून पिंपरी गावात जाणेसाठी व पिंपरी गावाकडून पुणे शहरात जाणेसाठी नागरीकांना विनाअडथळा प्रवास करणे शक्य होणार आहे. यामुळे नागरीकांच्या वेळेचा व इंधनाचा होणारा अपव्यय टळणार आहे. तसेच नागरिकांना लवकरात लवकर पिंपरी गांव, रहाटणी, पिंपळे सौदागर इ. ठिकाणी पोहचण्यासाठी पर्याय उपलब्ध होणार आहे.

### सदर कामाची संक्षिप्त माहिती..

निविदा रक्कम – र. रू. ५८.५७ कोटी
स्विकृत निविदा रक्कम – र. रू. ६५.२८ कोटी
कामाचे आदेश दि.- ३१/०३/२०२३.
कामाची मुदत – २४ महिने.
ठेकेदाराचे नांव – मे. टि. अँड टी इन्फ्रा लि. पुणे.

> "मनपाने पुलाच्या कामासाठी संरक्षण विभागाकडून ५.९६ एकर जागा ताब्यात घेतली असून त्यापोटी २३.८५ कोटी अदा केलेले आहे. जानेवारी २०२२ मध्ये रेल्वे लाईनवरील उड्डाण पुलाचे रेखांकनास मंजूरी घेवून निविदा काढण्यात आलेली आहे.या कामामुळे पिंपरी गाव पिंपळे सौदागर रहाटणी परिसरातील प्रवास जलद होणार आहे."
>
> – **श्रीकांत सवणे,** मुख्य अभियंता, पिंपरी चिंचवड मनपा.




# काय बदलले? काहीच नाही...

**नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भाजपच्या सरकारने ९ जून २०२४ रोजी शपथ घेतली. भाजपसाठी या सरकारची सुरुवात आनंददायी झाली असे काही म्हणता येणार नाही. कारण हे सरकार स्थापन करताना पंतप्रधान नरेंद्र मोदींना टीडीपी आणि जेडी(यू) च्या नेत्यांना बरोबर घ्यावे लागले आणि त्यांना काही खाती द्यावी लागली.**

सभापती निवडीबाबतही त्यांना आघाडीतील या सहकाऱ्यांबरोबर सल्लामसलत करावी लागली. गेली २२ वर्षे केंद्र तसेच गुजरातसारख्या राज्यातील सरकारचे प्रमुख म्हणून वावरणाऱ्या नरेंद्र मोदींसाठी हे दोन्हीही अनुभव असामान्य होते. हे सरकार स्थापन झाल्यापासून गेल्या २० दिवसांत त्याला अनेक धक्क्यांमागून धक्के बसले आहेत. जेईई, नीटसारख्या स्पर्धा परीक्षांचे आयोजन करणाऱ्या नॅशनल टेस्टिंग एजन्सीमधल्या गैरकारभारामुळे लाखो विद्यार्थ्यांच्या आकांक्षा भस्मसात झाल्या. जलपाईगुडी येथे भीषण रेल्वे अपघात झाला. जम्मू-काश्मीरमध्ये दहशतवादी हल्ले सुरूच आहेत. टोमॅटो, बटाटा आणि कांद्याचे भाव गेल्या काही वर्षांत अनुक्रमे ३९, ४१ आणि ४३ टक्क्यांनी वाढले आहेत. सेन्सेक्स आणि निफ्टीने ऐतिहासिक उच्चांक गाठला तर डॉलर-रुपया विनिमय दर ऐतिहासिक नीचांकी पातळीवर गेला. महामार्गावरील पथकर १५ टक्क्यांनी वाढवला गेला. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी



'अहंकार' दाखवणाऱ्यांवर उघड टीका करत त्यांना ताकीद दिली; भाजप नेतृत्वाने त्याबाबत कुरबुर केली खरी, पण सध्याच्या काळात विवेक दाखवणे हेच धाडसाचे आहे, असे ठरवून टाकले. हे सगळे कमी म्हणून की काय भाजपच्या अनेक राज्य शाखांमध्ये स्थानिक पातळीवर बंडखोरी झाली.१८ व्या लोकसभेच्या पहिल्या अधिवेशनात अध्यक्षपदाची निवडणूक आणि राष्ट्रपतींचे अभिभाषण सोडले तर कोणतेही ठोस कामकाज झाले नाही. मात्र रोजच्या कामकाजातही वाद निर्माण झाले. वास्तविक लोकसभेत सर्वाधिक वेळा निवडून आलेल्या संसद सदस्याला निवडून आलेल्या सदस्यांना शपथ देण्यासाठी तात्पुरता अध्यक्ष म्हणून नियुक्त केले जाते, परंपरा अशी आहे. यावेळी निर्विवादपणे तो मान के. सुरेश (काँग्रेस-केरळ) यांचा होता. ते सलग नाही पण वेगवेगळ्या काळात मिळून आठव्यांदा निवडून आले आहेत. असे असतानाही, सरकारने बी. महताब (भाजप-ओडिशा) यांच्याकडे इतर सदस्यांना शपथ देण्याचे काम सोपवले. बी. महताब हे सुरेश यांच्यापेक्षा कमी वेळा म्हणजे सातव्यांदा निवडून आले आहेत. (ते सहा वेळा बीजेडीच्या तिकिटावर आणि नंतर भाजपमध्ये जाऊन सातव्यांदा भाजपच्या तिकिटावर निवडून आले आहेत.के. सुरेश यांच्याकडे शपथ देण्याची जबाबदारी देण्याचे टाळून आणि ती बी. महताब यांच्याकडे सोपवून भाजपने विनाकारण वाद ओढवून घेतला. भाजपने असे का केले असावे? याची काही उत्तरे देता येतात. एक उत्तर म्हणजे 'माझा मार्ग हाच राजमार्ग' असे मानणाऱ्या भाजपच्या सर्वोच्च नेत्याच्या कार्यपद्धतीत लोकसभा निवडणुकीच्या निकालांनी अडथळा आणलेला नाही, असे भाजपला सूचित करायचे असावे. दुसरे उत्तर असे असू शकते की नेहमीच वाद ओढवून घेणाऱ्या, नव्या सरकारमध्ये संसदीय कामकाज हे खाते सांभाळणाऱ्या के. रिजिजू, यांना आपल्या आगमनाची वर्दी द्यायची असावी. सर्वात तर्कसंगत उत्तर असे आहे की इतर सर्व सदस्यांना शपथ देण्यासाठी बी. महताब यांची नियुक्ती हे महताब यांना बीजेडीमधून भाजपमध्ये गेल्याबद्दल बक्षीस होते आणि इतर खासदारांना भाजपमध्ये जाण्यासाठी प्रोत्साहन किंवा आमीष होते.सभापतीपदाची निवडणूक चुरशीची झाली असली तरी उर्वरित अधिवेशनावर त्याचा परिणाम होण्याची गरज नव्हती. पण सभापतींनी ४९ वर्षांपूर्वी (होय, ४९ वर्षे, ५० नव्हे) आणीबाणी लादण्यासाठी काँग्रेसला विरोध करणारा ठराव मांडला आणि कटुता आणखी वाढली! आता यापुढच्या काळात संसद १९४७ मध्ये काश्मीरवर आक्रमण केल्याबद्दल पाकिस्तानचा, १९६२ च्या युद्धाबद्दल चीनचा आणि १९७१ मध्ये भारताला धमकावण्यासाठी विमानवाहू जहाज पाठवल्याबद्दल अमेरिकेचा निषेध करून इतिहासाचे आणखीही धडे 'शिकवू' शकते. हा ठराव अवास्तव चिथावणी देणारा होता.या वाईट सुरुवातीनंतर खरेतर दोन्ही सभागृहांच्या संयुक्त अधिवेशनात झालेले राष्ट्रपतींचे अभिभाषण हे वातावरण पुन्हा पूर्ववत करण्यासाठीची संधी होती, परंतु सरकारने तीही हातची घालवली.

## संपादकीय »

### 'महा'पणास आव्हान!

***कर्ज रकमेपेक्षा तब्बल १६.५ टक्क्यांनी वाढून तो सात लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक झाला ही एकच चिंतेची बाब म्हणता येणार नाही.***

सरत्या आर्थिक वर्षात महाराष्ट्रासारख्या तुलनेने श्रीमंत राज्याच्या डोक्यावरील कर्जाचा बोजा गतवर्षीच्या कर्ज रकमेपेक्षा तब्बल १६.५ टक्क्यांनी वाढून तो सात लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक झाला ही एकच चिंतेची बाब म्हणता येणार नाही. गेली काही वर्षे राज्यावरील कर्ज सातत्याने वाढतेच आहे. म्हणजे २०१९-२० साली या कर्जाची रक्कम चार लाख ५१ हजार ११७ कोटी रु. इतकी होती तर पुढच्याच वर्षी ती पाच लाख १९ हजार ८६ कोटी रु. आणि त्यापुढल्या वर्षी पाच लाख ७६ हजार ८६८ कोटी रुपयांवर गेली. गतसाली हे कर्ज होते सहा लाख २९ हजार २३५ कोटी रु. इतके. ते आता सात लाख ११ हजार २७८ कोटी रु. इतके असेल. हे मर्यादेच्या बाहेर नाही. आर्थिक शिस्तीसंदर्भात सर्वानुमते ठरलेल्या धोरणानुसार कोणत्याही राज्यास त्याच्या सकल राज्यस्तरीय उत्पन्नाच्या २५ टक्क्यांपर्यंत कर्ज उभारण्याची मुभा असते.

नवनियुक्त १८ व्या लोकसभेत ५२ टक्के म्हणजे २८१ खासदार पहिल्यांदा निवडून आलेले आहेत. महाराष्ट्राचं चित्र तर पूर्ण बदललेलं आहे. राज्यातील काही खासदारांची कामगिरी इतकी निकृष्ट होती की ते पराभूत झाले याचं कोणालाही दुःख वाटू नये.

# पराभूत झाले याचं कोणालाही दु:ख वाटू नये

गोपाळ शेट्टींची लोकसभेतील हजेरी भले १०० टक्के होती पण, त्यांचा सहभाग शून्यच होता. भाजपमधील सुजय विखे-पाटील, प्रीतम मुंडे, भारती पवार, पूनम महाजन, संजयकाका पाटील तर, शिवसेनेच्या शिंदे गटाचे प्रमुख राहिलेले राहुल शेवाळे, संजय मंडलिक अशा अनेकांना मतदारांनी घरी बसवलं आहे. अनेक मराठी खासदारांच्या संसदेपेक्षा संसदेबाहेरील कामगिरीची चर्चा दिल्लीत रंगलेली असे. हे खासदार हरले, त्यांच्या जागी आलेले खासदार त्यांच्यापेक्षा गंभीर आणि जमिनीवर पाय असलेले भासतात. त्यांची कामगिरी पुढील पाच वर्षांमध्ये कशी राहील हे समजेलच. कशाबशा वाचल्या त्या रक्षा खडसे. त्यांच्या उमेदवारीसाठी दिल्लीतून प्रयत्न झाले असं म्हणतात! राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाच्या नीलेश लंके यांनी इंग्रजीतून शपथ घेऊन सुजय विखे पाटलांना चपराक दिली. लंकेंकडून एका 'राष्ट्रवादी'च्या पदाधिकाऱ्याने इंग्रजीतील शपथेची तयारी करून घेतली होती. कधीकाळी उत्पादन



शुल्क खात्यात उच्चपदावर असलेले नामदेव किरसान यांच्यासारखे खासदार लोकसभेत आलेले आहेत. लोकसभेत चर्चेमध्ये सहभागी होऊ शकतील असे शिवसेनेच्या ठाकरे गटाचे अनिल देसाई आहेत. काँग्रेसकडून वर्षा गायकवाड, प्रणिती शिंदे दोन्ही महिला खासदारांच्या कामगिरीकडं विशेष लक्ष असेल. अमोल कोल्हेंची शेरो-शायरी पुन्हा ऐकायला मिळू शकेल. ओरिजिनल राष्ट्रवादी काँग्रेस असा उल्लेख करणारे सुनील तटकरे पुन्हा लोकसभेत आले असून त्यांचा विजय खरं तर महायुतीसाठी आदर्श ठरावा! तटकरे या विजयाला 'रायगड पॅटर्न' म्हणतात. १७ व्या लोकसभेतील गणंग-भणंग मराठी खासदार गेले असल्याने आता नव्या खासदारांकडून अपेक्षा वाढलेल्या आहेत.संसदेच्या नव्या इमारतीमध्ये राजकीय पक्षांची कार्यालयं अजून सुरू झाली नसल्यानं वेगवेगळ्या पक्षांचे खासदार संसदेच्या जुन्या, ऐतिहासिक इमारतीतील जुन्या कार्यालयात बसतात. काँग्रेसचं संसदीय पक्षाचं कार्यालयही जुन्या संसद भवनात म्हणजे आत्ताच्या संविधान सदनामध्ये आहे. त्यामुळं तिथं त्यांच्या बैठका होतात. इथलं शिवसेनेचं कार्यालय शिंदे गटाच्या ताब्यात गेल्यामुळं त्यांचे खासदारही संविधान सदनात जाताना दिसतात. चार महिन्यांमध्ये संसदेच्या आवाराचा 'ले-आऊट' बदलून गेलाय. आत येताना नजरेला पडणारे छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, डॉ. आंबेडकर डोळ्यासमोरून गायब झाले आहेत. शिवरायांचा अश्वारूढ पुतळा मराठी माणसाच्या अस्मितेला साद घालत असे. छत्रपती शाहू महाराजांचा पुतळाही संसदेच्या आवारात असला तरी तो जुन्या संसद भवनामध्ये पंतप्रधानासाठी असलेल्या द्वार क्रमांक पाचच्या समोर उभा होता.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# तर आपण अराजकतेकडे जाऊ!

## पुण्यातील अपघातावरून राज ठाकरेंनी व्यक्त केला संताप!

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुण्यातील कल्याणी नगर भागात एका अल्पवयीन मुलानं मद्यधुंद अवस्थेत पोर्श कार चालवून दोघांना चिरडल्याची घटना घडली होती. या अपघातात अनिश अवधिया आणि अश्विनी कोस्टा या दोघांचा मृत्यू झाला होता. या घटनेला आता जवळपास एक महिन्यांच्या वर कालावधी उलटून गेला आहे. मात्र, या प्रकरणाची अद्यापही चर्चा सुरू आहे. दरम्यान, या प्रकरणावर आता मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनीही संताप व्यक्त केला आहे.**



राज ठाकरे यांनी नुकताच अमेरिकेतील बृहन्महाराष्ट्र मराठी मंडळाला मुलाखत दिली. या मुलाखतीत राज ठाकरे यांनी विविध विषयांवर त्यांची भूमिका स्पष्ट केली. यावेळी पुण्यातील अपघात प्रकरणावर संताप व्यक्त करत त्यांनी व्यवस्थेबाबतचा रागही व्यक्त केला."पुण्यात एका मुलाने पोर्श गाडीने दोन मुलांना धडक दिली. या अपघातात त्याचा मृत्यू झाला. त्यानंतर माध्यमांत त्या मुलाचे बाबा, आई, आजोबा सर्वांची चर्चा झाली. मात्र, या अपघातात ज्या दोघांचा मृत्यू झाला, त्यांच्याबाबात कोणीही बोलत नाही. कोणत्याही वृत्तावाहिनीवर त्यांची किंवा त्यांच्या आईवडिलांची चर्चा होताना दिसत नाही", अशी संतप्त प्रतिक्रिया राज ठाकरे यांनी दिली.ज्यावेळी ही घटना घडली आणि हे प्रकरण न्यायालयात गेलं. तेव्हा न्यायाधीश त्या मुलाला ३०० शब्दांचा निबंध लिहायला सांगतात, हे कोणते न्यायाधीश आहेत? हे सगळं उगाच घडत नाही. पैशांची देवाण घेवाण झाल्याशिवाय या गोष्टी घडू शकत नाही", असेही राज ठाकरे म्हणाले. तसेच "अशा घटना घडत असतील तर विश्वास कुणावर ठेवायचा, पोलिसांवर, प्रशासनावर, न्यायालयांवर की राजकीय नेत्यांवर? या सगळ्यांवरून जर लोकांना विश्वास उडाला, तर आपण अराजकतेकडे जाऊ", अशी प्रतिक्रियाही त्यांनी दिली. एका बांधकाम व्यावसायिकाच्या अल्पवयीन मुलाने मद्यधुंद अवस्थेत ताशी ११० किमीच्या वेगाने पोर्श कार चालवत अनिश अवधिया आणि अश्विनी कोस्टा यांना धडक दिली होती. ही धडक इतकी जोरात होती की अश्विनीचा जागीच मृत्यू झाला. तर अनिशला रुग्णालयात नेण्यात आलं पण तिथे डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केलं होतं. अनिश अवधिया हा २४ वर्षांचा तरुण होता. पुण्यात त्याने इंजिनिअरिंग केलं होतं. तसंच मागच्या काही वर्षांपासून आयटी विभागात काम करत होता. तर अश्विनी कोस्टा त्याची मैत्रीण होती. दोघेही एकाच कंपनीत काम करत होते. मित्रांसह डिनरला गेले होते. हे दोघे बाईकवरुन निघाले त्यानंतर काही सेकंदातच भरधाव वेगात आलेल्या पोर्शने या दोघांना धडक दिली. ज्यात या दोघांचा मृत्यू झाला होता. या अपघाताच्या तपासादरम्यान अनेक धक्कादायक माहिती समोर येत गेली होती. हा अपघात घडल्यानंतर पोर्श या गाडीतील ड्रायव्हर बदलण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचा आरोप झाला होता. तसेच हा अपघात घडला त्यानंतर आरोपीच्या रक्ताचे नमुने बदलण्यात आल्याचीही धक्कादायक माहिती समोर आली होती. त्यानंतर आरोपीच्या रक्ताच्या नमुन्यामध्ये फेरफार केल्याप्रकरणी ससून रुग्णालयाच्या दोन डॉक्टरांना अटक करण्यात आली होती. दरम्यान, या सर्व प्रकऱणाचा अद्याप तपास सुरु आहे.राज ठाकरे यांनी नुकताच अमेरिकेतील बृहन्महाराष्ट्र मराठी मंडळाला मुलाखत दिली. या मुलाखतीत राज ठाकरे यांनी विविध विषयांवर त्यांची भूमिका स्पष्ट केली. यावेळी पुण्यातील अपघात प्रकरणावर संताप व्यक्त करत त्यांनी व्यवस्थेबाबतचा रागही व्यक्त केला."पुण्यात एका मुलाने पोर्श गाडीने दोन मुलांना धडक दिली.

### हे सगळं उगाच घडत नाही


या अपघातात त्याचा मृत्यू झाला. त्यानंतर माध्यमांत त्या मुलाचे बाबा, आई, आजोबा सर्वांची चर्चा झाली. मात्र, या अपघातात ज्या दोघांचा मृत्यू झाला, त्यांच्याबाबात कोणीही बोलत नाही. कोणत्याही वृत्तावाहिनीवर त्यांची किंवा त्यांच्या आईवडिलांची चर्चा होताना दिसत नाही", अशी संतप्त प्रतिक्रिया राज ठाकरे यांनी दिली.ज्यावेळी ही घटना घडली आणि हे प्रकरण न्यायालयात गेलं. तेव्हा न्यायाधीश त्या मुलाला ३०० शब्दांचा निबंध लिहायला सांगतात, हे कोणते न्यायाधीश आहेत? हे सगळं उगाच घडत नाही. पैशांची देवाण घेवाण झाल्याशिवाय या गोष्टी घडू शकत नाही", असेही राज ठाकरे म्हणाले. तसेच "अशा घटना घडत असतील तर विश्वास कुणावर ठेवायचा, पोलिसांवर, प्रशासनावर, न्यायालयांवर की राजकीय नेत्यांवर? या सगळ्यांवरून जर लोकांना विश्वास उडाला, तर आपण अराजकतेकडे जाऊ", अशी प्रतिक्रियाही त्यांनी दिली.एका बांधकाम व्यावसायिकाच्या अल्पवयीन मुलाने मद्यधुंद अवस्थेत ताशी ११० किमीच्या वेगाने पोर्श कार चालवत अनिश अवधिया आणि अश्विनी कोस्टा यांना धडक दिली होती. ही धडक इतकी जोरात होती की अश्विनीचा जागीच मृत्यू झाला. तर अनिशला रुग्णालयात नेण्यात आलं पण तिथे डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केलं होतं.

# अडीच वर्ष सरकारला बहिणी आठवल्या नाहीत का?

## लाडकी बहीण योजनेवरून आदित्य ठाकरेंचा टोला

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्याच्या विधानसभेचं पावसाळी अधिवेशन सुरू आहे. यामध्ये माझी लाडकी बहीण या योजनेची घोषणा सरकारने केली. मात्र, या योजनेच्या लाभासाठी अनेक जाचक अटी घातल्याचा आरोप विरोधक करत आहेत.**



जवळपास एक कोटी महिलांना माझी लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून महिन्याला दीड हजार रुपये, देण्यात येणार आहेत. योजनवरून आता शिवसेना ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी महायुती सरकारवर टीका केली आहे. "अडीच वर्ष सरकारला बहिणी आठवल्या नाहीत का?", असा टोला आदित्य ठाकरे यांनी लगावला."महायुती सरकारने मांडलेल्या गाजर अर्थसंकल्पाची चिरफाड जनता करत आहे. दोन वर्ष सत्तेत असताना यांना कधीही बहिणींची किंवा शेतकऱ्यांची आठवण झाली नाही. ही तीच भाजपा आहे, जेव्हा दिल्लीत शेतकरी आंदोलनाला बसले होते. तेव्हा त्यांच्यावर लाठीचार्ज केला होता. त्यांना अतिरेकी म्हटलं होतं. त्यांच्यावर गोळीबार करण्यात आला. महाराष्ट्रातही याच भाजपा सरकारने त्यांना अर्बन नक्षलवादी म्हटले होते", अशी टीका आदित्य ठाकरे यांनी माध्यमांशी बोलताना केली. लाडकी बहिण योजनेसाठी दीड हजार रुपये दिले जाणार आहेत. मात्र, आम्ही त्यांना आठ हजार रुपये देण्याची मागणी केली होती. त्यातही त्यांनी १०० अटी घालून ठेवल्या आहेत. त्यानंतरही समजा ते दीड हजार रुपये मिळाले तरी आज दीड हजार रुपयांमध्ये काय होणार? आता भारतीय जनता पक्षाच्या सरकारने जी महागाई करून ठेवली आहे. त्यामध्ये या दीड हजार रुपयांमध्ये काय होणार आहे. आता निवडणुकीत पराभव होईल, या भितीने काहीतरी करायचं म्हणून सरकार काहीतरी घोषणा करत आहे.

### सरकारने कोणत्या घोषणा केल्या?

मध्य प्रदेशच्या लाडली बेहेन योजनेच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राने लाडकी बहीण योजना आणली आहे. एक कोटी महिलांना माझी लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून महिलांना महिना दीड हजार रुपये, ५२ लाख महिलांना वर्षाला तीन मोफत गॅस सिलेंडर, १० हजार महिलांना ई-रिक्षा खरेदीसाठी अर्थसाह्य,'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' आणि मोफत शिक्षण या दोन्ही महत्त्वाकांक्षी योजनांमध्ये घालण्यात आलेल्या अटी जाचक असल्याची टीका आता विरोधक करत आहेत.

# दिल्ली छत दुर्घटनेप्रकरणी कारवाई?

## मृताच्या कुटुंबासाठी 20 लाख रुपयांची भरपाई सरकारने जाहीर

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**



**मुसळधार पावसाने दिल्ली विमानतळावर छताचा काही भाग कोसळून ४५ वर्षीय टॅक्सीचालकाचा मृत्यू झाल्याची घटना शुक्रवारी घडली. पोलिसांनी चालक रमेश कुमार यांचा मृतदेह विच्छेदनानंतर शनिवारी त्यांच्या कुटुंबीयांकडे सोपवला. दरम्यान, सर्व विधी पार पडल्यानंतर संबंधितांवर कायदेशीर कारवाईचा निर्णय घेणार असल्याचे कुमार यांच्या २५ वर्षीय मुलाने 'पीटीआय'ला सांगितले.**

'विच्छेदनानंतर दुपारी साडेबाराच्या सुमारास आम्हाला वडिलांचा मृतदेह मिळाला. अंत्यसंस्कारानंतर कुटुंबातील सर्व सदस्य चर्चा करून वडिलांच्या मृत्यूला जबाबदार असणाऱ्यांवर गुन्हा दाखल करायचा की नाही याचा निर्णय घेतील,' असे रविंदर कुमार याने सांगितले. रमेश शुक्रवारी पहाटे इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावरील टर्मिनल-१ येथे प्रवाशांची वाट पाहत होते. त्याचवेळी सलग तीन तासांच्या मुसळधार पावसाने विमानतळाच्या छताचा काही भाग खाली असलेल्या वाहनांवर कोसळला. या घटनेत रमेश कुमार यांचा मृत्यू, तर सहा जण जखमी झाले होते.मृताच्या कुटुंबासाठी २० लाख रुपयांची भरपाई सरकारने जाहीर केली, परंतु रवींदर यांनी नुकसानभरपाईच्या रकमेवर नाराजी व्यक्त केली आहे.नवी दिल्ली : तीव्र उष्णतेच्या लाटांनी हैराण झालेल्या दिल्लीकरांना शुक्रवारी पावसाच्या जोरदार सरींनी दिलासा मिळाला. आता आगामी चार दिवसांत भारतीय हवामान विभागाने (आयएमडी) मुसळधार पावसासह 'ऑरेंज अलर्ट' जारी केला आहे. दिल्लीत शुक्रवारी मान्सून दाखल झाल्यानंतर जून महिन्यातील गेल्या ८८ वर्षांतील सर्वाधिक पाऊस कोसळला. शुक्रवारच्या जोरदार सरींनंतर शनिवारी सकाळी रोहिणी आणि बुरारीसह दिल्लीच्या काही भागांत पाऊस झाला. दरम्यान, दिल्लीमध्ये रविवारी दिवसभर मध्यम ते मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. तसेच सोमवारीही आणखी जोरदार पावसाचा अंदाज असल्याचे हवामान विभागाने सांगितले. पुढील सात दिवसांत ढगांच्या गडगडाटासह मध्यम ते मुसळधार पावसाचा अंदाजही हवामान विभागाने वर्तवला आहे. दिल्लीतील वसंत विहार परिसरात एका बांधकामाच्या ठिकाणी कोसळलेल्या भिंतीच्या ढिगाऱ्यातून शनिवारी तीन मजुरांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले. शुक्रवारी बांधकाम सुरू असलेली भिंत कोसळल्याची घटना घडली होती. घटनेची माहिती दिल्ली अग्निशमन दलाला पहाटे साडेपाचच्या सुमारास देण्यात आली. ढिगाऱ्याखालून तीन मजुरांचे मृतदेह बाहेर काढण्यात आल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.'विच्छेदनानंतर दुपारी साडेबाराच्या सुमारास आम्हाला वडिलांचा मृतदेह मिळाला. अंत्यसंस्कारानंतर कुटुंबातील सर्व सदस्य चर्चा करून वडिलांच्या मृत्यूला जबाबदार असणाऱ्यांवर गुन्हा दाखल करायचा की नाही याचा निर्णय घेतील,' असे रविंदर कुमार याने सांगितले. रमेश शुक्रवारी पहाटे इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावरील टर्मिनल-१ येथे प्रवाशांची वाट पाहत होते. त्याचवेळी सलग तीन तासांच्या मुसळधार पावसाने विमानतळाच्या छताचा काही भाग खाली असलेल्या वाहनांवर कोसळला. या घटनेत रमेश कुमार यांचा मृत्यू, तर सहा जण जखमी झाले होते.मृताच्या कुटुंबासाठी २० लाख रुपयांची भरपाई सरकारने जाहीर केली, परंतु रवींदर यांनी नुकसानभरपाईच्या रकमेवर नाराजी व्यक्त केली आहे.नवी दिल्ली : तीव्र उष्णतेच्या लाटांनी हैराण झालेल्या दिल्लीकरांना शुक्रवारी पावसाच्या जोरदार सरींनी दिलासा मिळाला.

### दिल्लीत मुसळधार पावसाचा इशारा

आता आगामी चार दिवसांत भारतीय हवामान विभागाने (आयएमडी) मुसळधार पावसासह 'ऑरेंज अलर्ट' जारी केला आहे. दिल्लीत शुक्रवारी मान्सून दाखल झाल्यानंतर जून महिन्यातील गेल्या ८८ वर्षांतील सर्वाधिक पाऊस कोसळला. शुक्रवारच्या जोरदार सरींनंतर शनिवारी सकाळी रोहिणी आणि बुरारीसह दिल्लीच्या काही भागांत पाऊस झाला. दरम्यान, दिल्लीमध्ये रविवारी दिवसभर मध्यम ते मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. तसेच सोमवारीही आणखी जोरदार पावसाचा अंदाज असल्याचे हवामान विभागाने सांगितले. पुढील सात दिवसांत ढगांच्या गडगडाटासह मध्यम ते मुसळधार पावसाचा अंदाजही हवामान विभागाने वर्तवला आहे.दिल्लीतील वसंत विहार परिसरात एका बांधकामाच्या ठिकाणी कोसळलेल्या भिंतीच्या ढिगाऱ्यातून शनिवारी तीन मजुरांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले. शुक्रवारी बांधकाम सुरू असलेली भिंत कोसळल्याची घटना घडली होती. घटनेची माहिती दिल्ली अग्निशमन दलाला पहाटे साडेपाचच्या सुमारास देण्यात आली. ढिगाऱ्याखालून तीन मजुरांचे मृतदेह बाहेर काढण्यात आल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.मुसळधार पावसाने दिल्ली विमानतळावर छताचा काही भाग कोसळून ४५ वर्षीय टॅक्सीचालकाचा मृत्यू झाल्याची घटना शुक्रवारी घडली.

# इराणमध्ये अध्यक्षपदासाठी फेरमतदान


## सुधारणावादी मसूद पेझेश्कियाँ आघाडीवर, पण बहुमताची हुलकावणी


। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**इराणमध्ये अध्यक्षपदाच्या निवडणुकीमध्ये चारपैकी कोणत्याही एका उमेदवाराला आवश्यक किमान ५० टक्के मते न मिळाल्यामुळे तिथे पुन्हा एकदा आघाडीच्या दोन उमेदवारांमध्ये लढत होणार आहे. शुक्रवारी झालेल्या मतदानामध्ये इराणच्या इतिहासातील आतापर्यंत सर्वात कमी म्हणजे ४० टक्क्यांपेक्षा कमी मतदारांनी सहभाग घेतला. आता ५ जुलैला फेरमतदान होईल.**

इराणमध्ये मंदावलेली अर्थव्यवस्था, राजकीय व सामाजिक अस्थैर्य, सततची निदर्शने आणि पश्चिम आशियामधील तणावाची स्थिती यामुळे त्रस्त झालेल्या मतदारांनी शुक्रवारी सुधारणावादी नेते मसूद पेझेश्कियाँ यांना सर्वाधिक तर सईद जलिली या कट्टर, पुराणमतवादी नेत्याला दुसऱ्या क्रमांकाची मते दिली. मात्र, इराणमध्ये अध्यक्षपदाची निवडणूक जिंकण्यासाठी किमान ५० टक्के मते मिळणे आवश्यक असते. त्यामध्ये पेझेश्कियाँ कमी पडले. पेझेश्कियाँ हे हृदय शल्यविशारद असून ते इराणबाहेर फारसे प्रसिद्ध नाहीत. तर जलिली हे इराणच्या अणुकार्यक्रमासंबंधी आंतरराष्ट्रीय पातळीवरील वाटाघाटी करणारे नेते म्हणून बाहेरील जगाला ज्ञात आहेत.या मतदानाच्या माध्यमातून





इराणच्या जनतेने आपण नेते आणि व्यवस्थेला नाकारत असल्याचा संदेश दिला असल्याचे मत चॅथम हाऊसच्या पश्चिम आशिया व उत्तर आफ्रिकेच्या संचालक सनम वकील यांनी व्यक्त केले. यातून जनमताची उदासीनता, वैफल्य दिसून येते असे त्या म्हणाल्या. इराणच्या सुमारे ६.१० कोटी मतदारांपैकी जवळपास २.४५ कोटी जणांनी मतदान केले. त्यापैकी पेझेश्कियाँ यांना एक कोटी चार लाख इतकी तर जलिली यांना ९४ लाख मते मिळाली. तिसऱ्या क्रमांकावरील मोहम्मद बाघेर कालिबाफ यांना ३३ लाख मते मिळाली. इब्राहिम रियासी यांचा गेल्या महिन्यात हेलिकॉप्टर दुर्घटनेत मृत्यू झाल्यानंतर अध्यक्षपदाची निवडणूक जाहीर करण्यात आली होती. मतदारांनी शुक्रवारी सुधारणावादी नेते मसूद पेझेश्कियाँ यांना सर्वाधिक तर सईद जलिली या कट्टर, पुराणमतवादी नेत्याला दुसऱ्या क्रमांकाची मते दिली.

### जिंकण्यासाठी 50 टक्के मते आवश्यक

मात्र, इराणमध्ये अध्यक्षपदाची निवडणूक जिंकण्यासाठी किमान ५० टक्के मते मिळणे आवश्यक असते. त्यामध्ये पेझेश्कियाँ कमी पडले. पेझेश्कियाँ हे हृदय शल्यविशारद असून ते इराणबाहेर फारसे प्रसिद्ध नाहीत. तर जलिली हे इराणच्या अणुकार्यक्रमासंबंधी आंतरराष्ट्रीय पातळीवरील वाटाघाटी करणारे नेते म्हणून बाहेरील जगाला ज्ञात आहेत.या मतदानाच्या माध्यमातून इराणच्या जनतेने आपण नेते आणि व्यवस्थेला नाकारत असल्याचा संदेश दिला असल्याचे मत चॅथम हाऊसच्या पश्चिम आशिया व उत्तर आफ्रिकेच्या संचालक सनम वकील यांनी व्यक्त केले.

# अदिती राव हैदरीशी सिद्धार्थ कधी करणार लग्न?

बॉलीवूडमध्ये सध्या लगीनघाई सुरू असल्याचं पाहायला मिळत आहे. गेल्या महिन्यात २७ मार्च रोजी अभिनेत्री अदिती राव हैदरीने अभिनेता सिद्धार्थशी गुपचूप साखरपुडा उरकला. गेल्या काही दिवसांपासून या जोडप्याने लग्न केल्याच्या चर्चांना उधाण आलं होतं. परंतु, इन्स्टाग्राम पोस्ट शेअर करत सर्व चर्चांना पूर्णविराम देत तेलंगणातील वानापर्थी जिल्ह्यातील श्रीरंगापुरम इथं साखरपुडा केल्याचं अदितीने जाहीर केलं. सिद्धार्थ-अदितीचा गुपचूप साखरपुडा पार पडल्यावर आता हे जोडपं लग्न केव्हा करणार याची चाहते प्रतीक्षा करत आहेत. नुकत्याच पार पडलेल्या 'गलाट्टा गोल्डन स्टार्स' सोहळ्यात सिद्धार्थने लग्नाबद्दल भाष्य केलं आहे. लग्न केव्हा करणार या प्रश्नावर मौन सोडत अभिनेता म्हणाला, "अनेक लोकांचा असा समज झालाय की, आम्ही गुपचूप साखरपुडा केला. पण, फक्त कुटुंबाबरोबर एखाद्या कार्यक्रमाचं आयोजन करणं आणि गुपचूप एखादा कार्यक्रम करणं यात खूप मोठा फरक आहे. ज्या लोकांना आम्ही साखरपुड्याला बोलावलं नाही त्यांना असं वाटतं की, यामागे नक्की काहीतरी गुपित आहे. परंतु, जे लोक तिथे उपस्थित होते त्यांना माहितीये की, हा कार्यक्रम खूप प्रायव्हेट होता. आमचे





जवळचे कुटुंबीय आणि काही नातेवाईक त्यावेळी उपस्थित होते."सिद्धार्थ लग्नाबद्दल म्हणाला, "अदितीने मला होकार देण्यासाठी किती वेळ घेतला वगैरे हे प्रश्न आता दूर राहिले. मी खूप दिवस विचार करत होतो की, ही मला होकार कळवेल का? की नाही सांगेल. पण, सुदैवाने ती हो म्हणाली. आता आम्ही लग्न केव्हा करणार याचा निर्णय कुटुंबातील वरिष्ठ लोक घेतील. त्यांचा निर्णय आम्हा दोघांसाठी महत्त्वाचा असेल. ही काही चित्रपटाच्या शूटिंगची तारीख नाही की, मी ठरवेन तसं होईल. मोठ्या लोकांमध्ये चर्चा झाल्यावर तेच निर्णय घेतील."'महा समुद्रम' नावाच्या चित्रपटात अदिती व सिद्धार्थने एकत्र काम केलं होतं. या चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान आदिती व सिद्धार्थ एकमेकांच्या प्रेमात पडले आणि रिलेशनशिपमध्ये आले. आता लवकरच ही जोडी विवाहबंधनात अडकणार आहे. दरम्यान, सिद्धार्थ लवकरच 'इंडियन २' चित्रपटात झळकणार आहे.

## सुकुमारनने केलं नेपोटीझमवर भाष्य

'नेपोटीझम' हा गेल्या काही वर्षांपासूनचा वादग्रस्त मुद्दा आहे. बॉलिवूड इंडस्ट्रीत याबाबत अनेक वादविवाद पाहायला मिळतात पण इतर सिनेइंडस्ट्रीमध्ये या गोष्टीला तितकंस महत्त्व दिलं जात नाही. बॉलिवूड इतकीच मोठी असणाऱ्या साऊथ इंडस्ट्रीमध्येही अनेक कलाकार फिल्मी कुटूंबातून आलेले आहेत. याबाबत साऊथ सुपरस्टार पृथ्वीराज सकुमारनने मॅशेबल इंडियाशी संवाद साधला आणि नेपोटीझमबाबत त्याच मत व्यक्त केलं.पृथ्वीराज त्याचा मित्र दुलकर सलमानबाबत बोलत असताना त्याने नेपोटीझमविषयी भाष्य केलं. तो म्हणाला,"मी ही नेपोकिड आहे हे मी मान्य करतो आणि हे सत्य आहे. मी फक्त आता माझ्याविषयी सांगतो. मी ही या इंडस्ट्रीत फक्त माझ्या नावामुळे आलो. मी हे स्वीकारलं आहे आहे कि, मला फक्त माझ्या नावामुळे या इंडस्ट्रीत प्रवेश मिळाला.

## करीनाचीक्रेझ आजही कायम



बॉलिवूडची ग्लॅमगर्ल बेबो म्हणजेच करीना कपूरची क्रेझ आजही कायम आहे. नुकताच तिचा क्रू हा सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीस आला. तिचा हा सिनेमा चांगलाच गाजतोय. याचदरम्यान तिने तिच्या चाहत्यांशी संवाद साधला. यावेळी तिने दिलेल्या उत्तरांनी सगळ्यांचं लक्ष वेधून घेतलं.करीनाने तिच्या चाहत्यांशी इंस्टाग्रामवरील आस्क मी नाऊ या फिचरद्वारे संवाद साधला. यावेळी तिच्या एका चाहत्याने तिला ती लहानपणी कोणतं कार्टून बघायची असा प्रश्न विचारला त्यावर करिनाने 'टॉम एन जेरी' कार्टूनचा फोटो शेअर केला आणि "टीम आणि जेह प्रमाणे मी सुद्धा टॉम एन जेरी बघायचे" असं उत्तर दिलं. एका चाहत्याने तिला तिचं आवडीचं जेवण काय आहे असं विचारलं त्यावर तिने,"खूप मोठी लिस्ट आहे जसं कि पिझ्झा, खिचडी. कढी चावल, बिर्याणी आणि बरंच काही..." असं उत्तर दिलं.तर एकाने तिला तू जेव्हा 'सोना कितना सोना है' हे गाणं गायलंस तेव्हा लोलोची (करिष्मा) रिॲक्शन कशी होती? असा प्रश्न केला त्यावर तिने,"तिला खूप आवडलं. "इतकंच नाही तर करीनाने यावेळी तिच्या आगामी प्रोजेक्टबाबतही महत्त्वाचा खुलासा केला.

## 'मेट गाला 2024' ला दीपिका राहणार गैरहजर

मॉम टू बी' दीपिका पादुकोण सध्या सतत चर्चेत आहे. तिच्या सोशल मीडिया पोस्ट, वेगवेगळ्या कार्यक्रमांना ती लावत असलेली हजेरी यावर तिचे चाहते बारीक नजर ठेवून असून सतत तिच्याविषयीचे अपडेट्स जाणून घेण्यास उत्सुक असतात. आपल्या युनिक फॅशन सेन्समुळे चर्चेत राहणाऱ्या दीपिकाच्या चाहत्यांसाठी मात्र एक निराशाजनक बातमी आहे. दीपिका यंदाच्या 'मेट गाला 2024' या कार्यक्रमाला हजेरी लावणार नाहीये. गेल्या काही वर्षांपासून दीपिका या कार्यक्रमाला सातत्याने हजेरी लावली आहे. पण यंदा तिच्या पूर्वनियोजित कामांमुळे ती यावेळी मेट गालाला उपस्थित राहू शकणार नसल्याचं म्हंटलं जातंय.सूत्रांच्या म्हणण्यानुसार, दीपिकाने आधीच तिच्या तारखा सिनेमाच्या शूटसाठी दिल्या आहेत आणि ती या काळात तिच्या आगामी सिनेमाच्या शूटिंगमध्ये बिझी असणार आहे. सूत्रांनी इंडिया डॉट कॉम या वेबसाईटला दिलेली मुलाखतीत सांगितलं कि,"दीपिका सातत्याने मेट गालाच्या रेड कार्पेटवर हजेरी लावत आलीये. त्यामुळे यावर्षीही तिचे चाहते तिला रेड कार्पेटवर पाहण्यास उत्सुक असणं स्वाभाविक आहे. ती जागतिक स्तराची ब्रँड ॲम्बेसिडर असलेल्या भारतीय अभिनेत्रींपैकी एक आहे. दीपिका सध्या सिंघम ३ या सिनेमाच्या शूटमध्ये बिझी आहे आणि हा सिनेमा या वर्षी प्रदर्शित होणार आहे. यासोबतच तिचा कल्की २८९८ एडी हा सिनेमा या मे महिन्यात रिलीज होतो आहे. त्यामुळे तिचं सगळं वेळापत्रक मेट गालाच्या तारखांशी जुळत नाहीये. त्यामुळे ती या वर्षीच्या कार्यक्रमाला हजर राहू शकत नाही ." असं स्पष्टीकरण त्यांनी यावेळी दिलं. तसेच दीपिका प्रेग्नेंट असून सप्टेंबरमध्ये तिच्या बाळाचा जन्म होणार असल्याचं म्हंटलं जातंय. त्यामुळे सध्या ती जास्तीत जास्त वेळ तिचे आगामी प्रोजेक्ट्स पूर्ण करण्यात देत आहे. सोशल मीडियावर तिने तिच्या प्रेग्नेंसीची बातमी शेअर करताच तिच्या चाहत्यांना खूप आनंद झाला होता.'मेट गाला' हा कार्यक्रम हा न्यूयॉर्कमधील कॉस्च्युम इन्स्टिटयूटतर्फे दरवर्षी मे महिन्याच्या पहिल्या सोमवारी आयोजित केला जातो.

## रश्मिका मंदानाच्या बहिणीला व्हायचेय अभिनेत्री



दाक्षिणात्य इंडस्ट्रीबरोबरच बॉलीवूड सिनेसृष्टीतही आपल्या अभिनयानं प्रेक्षकांना भुरळ घालणारी आणि नॅशनल क्रश म्हणून ओळखली जाणारी अभिनेत्री म्हणजेच रश्मिका मंदाना. २०२३ रोजी प्रदर्शित झालेल्या 'ॲनिमल' चित्रपटामुळे ती अनेकदा चर्चेत आली. रश्मिकाला नेहमीच तिचं वैयक्तिक आयुष्य खासगी ठेवायला आवडतं. खूप कमी जणांना माहीत असेल की, रश्मिकाला एक लहान बहीण आहे आणि त्यांच्यात १६ वर्षांचं अंतर आहे. रश्मिकाची बहीण आता १० वर्षांची आहे.'नो फिल्टर नेहा' या नेहा धुपियाच्या शोला दिलेल्या मुलाखतीत रश्मिकानं तिच्या आणि बहिणीच्या नात्याबद्दल सांगितलं. रश्मिका म्हणाली, "तिला चित्रपट खूप आवडतात.जेव्हा मी चित्रपटांमध्ये रडते तेव्हा मला बघून ती तीन-चार तास रडते. तिला असं वाटतं की, माझी बहीण रडतेय, तिला त्रास होतोय. जर चित्रपटात मला कोणी ओरडलं, तर तिला ती व्यक्ती खऱ्या आयुष्यात आवडत नाही. ती त्याचा तिरस्कार करते. तिला असं वाटतं की, ही व्यक्ती माझ्या बहिणीला कशी काय त्रास देऊ शकते."ती नेहमी म्हणत असते की, मला अभिनेत्री व्हायचंय. जेव्हा मी घरी जाते आणि कोणी घरी आलं आणि माझ्याबराबर सेल्फी काढला, तर तीही त्या सेल्फीमध्ये येते आणि मस्त स्माइल वगैरे करते. मला ते सगळं क्यूट वाटतं. पण तिला हे माहीत नाही की, मी कधी उठते, मी किती व्यायाम करते, मी स्किन क्लिनिकला जाते तेव्हा मी काय करते. हे सगळं तिला अजून माहीत नाही. ती मला एक बहीण म्हणून पूर्णपणे ओळखते. तर हे सगळं पुढे जाऊन नक्की कसं असेल हे तिला अजून माहीत नाही. ती माझ्या लहान मुलीसारखीच आहे," असं रश्मिका म्हणाली.

# पंतने टी-20 विश्वचषकात केला विक्रम

## पंत फायनलमध्ये शून्यावर बाद होणारा पहिला भारतीय

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**टी-२० विश्व २०२४ च्या अंतिम सामन्यात भारताने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, पण कर्णधार रोहित शर्माचा हा निर्णय भारतासाठी योग्य ठरला नाही. या सामन्यात भारतीय संघाने अवघ्या ४,३ षटकात ३४ धावा करत तीन विकेट गमावल्या. टीम इंडियाची सुरुवात चांगली झाली होती, पण दक्षिण आफ्रिकेचा फिरकी गोलंदाज केशव महाराजने दुसऱ्याच षटकात कर्णधार रोहित शर्मा आणि ऋषभ पंतला बाद करत त्यांना अडचणीत टाकलं. यानंतर सूर्यकुमार यादवनेही फलंदाजी केली नाही आणि तो स्वस्तात बाद झाला. या दरम्यान ऋषभ पंतने एक नकोसा विक्रम केला.**



दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या अंतिम सामन्यात ऋषभ पंतने २ चेंडूंचा सामना केला आणि खातेही न उघडता बाद झाला. पंतला केशव महाराजने शून्यावर बाद केले. टी-२० विश्वचषकाच्या फायनलमध्ये शून्यावर बाद होणारा पंत हा पहिला भारतीय फलंदाज ठरला. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पंत प्रथमच शून्यावर बाद झाला. त्याचबरोबर टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये त्याने शून्य धावांवर विकेट गमावण्याची ही चौथी वेळ होती. पंत पहिल्यांदा टी-२० आंतरराष्ट्रीय मध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध शून्यावर बाद झाला होता, तर वेस्ट इंडिजविरुद्ध त्याने या फॉरमॅटमध्ये दोनदा शून्यावर विकेट गमावली होती. आता तो प्रोटीजविरुद्ध शून्यावर बाद झाला.अंतिम सामन्यात भारतीय कर्णधार रोहित शर्मा लयीत दिसत होता आणि त्याने दोन चौकारांच्या मदतीने ९ धावा केल्या होत्या, परंतु केशव महाराजच्या एका चेंडूला स्वीप करण्याच्या प्रयत्नात तो हेनरिक क्लासेनकडे झेलबाद झाला. अंतिम फेरीत सूर्यकुमार यादवकडून मोठ्या अपेक्षा होत्या आणि तो मोठी खेळी खेळेल असे वाटत होते, पण त्यानेही निराश होऊन कागिसो रबाडाच्या चेंडूवर क्लासेनकडे त्याचा झेल दिला. सूर्यकुमार यादवने ४ चेंडूत केवळ ३ धावांचा सामना केला.टीम इंडियाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत ७ विकेट्स गमावत १७६ धावा केल्या. भारताकडून विराट कोहलीने ५९ चेंडूत ७६ धावा केल्या. यादरम्यान त्याच्या बॅटमधून ६ चौकार आणि २ षटकार आले. तर अक्षर पटेलने ३१ चेंडूत १ चौकार आणि ४ षटकारांच्या मदतीने ४७ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. शिवम दुबेही शेवटी चमकला. त्याने १६ चेंडूत ३ चौकार आणि १ षटकारासह २७ धावांची खेळी खेळली. दक्षिण आफ्रिकेकडून ॲनरिक नॉर्किया आणि केशव महाराज यांनी प्रत्येकी दोन गडी बाद केले. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या अंतिम सामन्यात ऋषभ पंतने २ चेंडूंचा सामना केला आणि खातेही न उघडता बाद झाला. पंतला केशव महाराजने शून्यावर बाद केले. टी-२० विश्वचषकाच्या फायनलमध्ये शून्यावर बाद होणारा पंत हा पहिला भारतीय फलंदाज ठरला. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पंत प्रथमच शून्यावर बाद झाला. त्याचबरोबर टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये त्याने शून्य धावांवर विकेट गमावण्याची ही चौथी वेळ होती. पंत पहिल्यांदा टी-२० आंतरराष्ट्रीयमध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध शून्यावर बाद झाला होता,शून्यावर विकेट गमावली होती. आता तो प्रोटीजविरुद्ध शून्यावर बाद झाला.अंतिम सामन्यात भारतीय कर्णधार रोहित शर्मा लयीत दिसत होता आणि त्याने दोन चौकारांच्या मदतीने ९ धावा केल्या होत्या, परंतु केशव महाराजच्या एका चेंडूला स्वीप करण्याच्या प्रयत्नात तो हेनरिक क्लासेनकडे झेलबाद झाला.

### शिवम दुबेही शेवटी चमकला

कर्णधार रोहित शर्माचा हा निर्णय भारतासाठी योग्य ठरला नाही. कागिसो रबाडाच्या चेंडूवर क्लासेनकडे त्याचा झेल दिला. सूर्यकुमार यादवने ४ चेंडूत केवळ ३ धावांचा सामना केला.टीम इंडियाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत ७ विकेट्स गमावत १७६ धावा केल्या. भारताकडून विराट कोहलीने ५९ चेंडूत ७६ धावा केल्या. यादरम्यान त्याच्या बॅटमधून ६ चौकार आणि २ षटकार आले. तर अक्षर पटेलने ३१ चेंडूत १ चौकार आणि ४ षटकारांच्या मदतीने ४७ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. शिवम दुबेही शेवटी चमकला. त्याने १६ चेंडूत ३ चौकार आणि १ षटकारासह २७ धावांची खेळी खेळली. दक्षिण आफ्रिकेकडून ॲनरिक नॉर्किया आणि केशव महाराज यांनी प्रत्येकी दोन गडी बाद केले.

# विराटने तोडला बाबर आझमचा रेकॉर्ड

## किंग कोहलीने रोहितचं म्हणणं खरं करून दाखवलं!

।नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारतीय संघाने अंतिम फेरीत विराट कोहलीच्या संयमी फलंदाजीच्या जोरावर १७६ धावा केल्या आहेत. टी-२० विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात भारतीय कर्णधार रोहित शर्मान नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, मात्र भारतीय संघाने अवघ्या ३४ धावांत ३ विकेट गमावल्या. यानंतर संपूर्ण विश्वचषकाच्या मोसमात अपयशी ठरलेल्या विराट कोहलीने भारतीय डावाची धुरा सांभाळत परिस्थिती पाहत संयमी फंलदाजी करत अर्धशतकही झळकावले.**




विराट कोहलीने ५९ चेंडूत २ षटकार आणि ६ चौकारांसह ७६ धावांची खेळी केली. विराटच्या या खेळीसह विराटने रोहितचं म्हणणं खरं करून दाखवलं आहे. भारताने फलंदाजी करताना चांगली सुरूवात केली पण नंतर त्यांनी झटपट दोन विकेट्स गमावल्या. पण विराट कोहलीने डाव सावरला खरा पण अक्षर पटेलनेही दुसऱ्या टोकावरून कोहलीला पूर्ण साथ दिली आणि त्यानेही ३१ चेंडूत ४७ धावांची खेळी केली. विराट कोहलीने दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या अंतिम सामन्यात त्याच्या अर्धशतकादरम्यान बाबर आझमचा विक्रम मोडला आणि तो टी-२० मध्ये सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजांच्या यादीत दुसऱ्या स्थानावर पोहोचला. बाबर आझमने टी-२० मध्ये एकूण ४१४५ धावा केल्या आहेत, मात्र आता कोहलीने त्याला मागे टाकले आहे. मात्र, या यादीत भारताचा कर्णधार रोहित शर्मा पहिल्या क्रमांकावर आहे. इंग्लंडविरुद्धच्या सेमीफायनलमधील विजयानंतर विराट कोहलीबाबत रोहित शर्मा म्हणाला की, "कोहली एक उत्कृष्ट खेळाडू आहे. कोणताही खेळाडू खराब फॉर्ममधून जाऊ शकतो. त्याची खेळण्याची पध्दत आणि अशा मोठ्या सामन्यांमधील त्यांचे महत्त्व आम्हाला माहित आहे.

### कोहलीने 76 धावांची खेळी केली

१५ वर्ष खेळलेल्या खेळाडूसाठी फॉर्म हा चिंतेचा विषय नाही. त्याने सर्वोत्तम खेळी फायनलसाठी राखून ठेवली असावी." यंदाच्या टी-२० विश्वचषकाच्या सुरुवातीपासून विराट कोहली रोहित शर्मासोबत भारतीय संघासाठी सलामीसाठी उतरत आहे. दुर्दैवाने, त्याचा फॉर्म टीम इंडियासाठी चिंतेचा विषय ठरला कारण फायनलपूर्वी तो ७ डावात केवळ ७५ धावा करू शकला होता, पण रोहितने मात्र तरीही त्याला पाठिंबा देत म्हटले की विराटने त्याची खेळी फायनलसाठी राखून ठेवली आहे आणि विराटनेही अगदी तसंच केलं. भारतीय संघाला गरज असताना तो मैदानात पाय घट्ट रोवून उभा राहिला आणि भारताला चांगल्या धावसंख्येपर्यंत नेले.विराट कोहलीने ५९ चेंडूत २ षटकार आणि ६ चौकारांसह ७६ धावांची खेळी केली.